# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक, गडचिरोली
दिनांक- ३१/०१/२०१९

## गडचिरोली पोलीस दल व मैत्री परिवार संस्थेचे वतीने भव्य सामूहिक विवाह सोहळयाचे आयोजन

गडचिरोली पोलीस दलाचे वतीने जिल्हयातील आदिवासी जनतेसाठी विविध उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणुन भव्य सामूहिक विवाह सोहळयाचे कार्यक्रम आयोजित केले जात असतात. दुर्गम व अतिदुर्गम भागातील आदिवासी नागरिक आर्थिक परिस्थिती अभावी आपल्या मुला-मुलींचे विवाह मोठया थाटात पार पाडु शकत नाही. त्यांची स्वप्नपुर्ती करण्यासाठी गडचिरोली दल व मैत्री परिवार संस्थेचे वतीने **सामूहिक विवाह सोहळा - २०१९** या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक - ०३/०२/२०१९ रोजी **क्रीडा संकुल, आलापल्ली** येथे १०.०० वा करण्यात आले आहे.

गडचिरोली पोलीस दल व मैत्री परिवार संस्था यांनी आयोजित केलेल्या या सामूहिक विवाह सोहळयात गडचिरोली जिल्हयातील दुर्गम- दुर्गम भागातील ५४ आदिवासी जोडपे विवाहबध्द होणार असुन यात नक्षलवादी मार्गाचा त्याग केलेल्या ५ आत्मसमर्पीत जोडप्याचा समावेश आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी व सुक्ष्मनियोजनासाठी पोलीस दलाचे वतीने विविध समित्याचे मार्फतीने जय्यत तयारी सुरु आहे. संपुर्ण विवाह समिती, कार्यालयीन समिती, भोजन समिती, स्वागत समिती, विवाह समिती, निवास समिती, निवास यातायात समिती, स्वच्छता समिती, आरोग्य व्यवस्था समिती, लाईट मंडप व ध्वनी लॉन व स्टेज समिती, फोटो व शुटींग समिती, मिडीया समिती, पार्किंग व्यवस्था व सुरक्षा व्यवस्था समिती, या व इतर सर्व समित्या आपआपली जबाबदारी  पार पाडण्यात व्यस्त आहेत.

आदिवासींच्या रितीरिवाजानुसार आदिवासी परंपरा कायम ठेवत, वाजत गाजत थाटात मिरवणुक काढुन, मंगलाष्टकासह प्रफुल्लीत वातावरणात विवाह सोहळा पार पाडण्यात येणार आहे. सामूहीक विवाह सोहळ्यातील जोडप्यांना एकात्मीक आदिवासी विकास विभाग, कन्यादान योजने अंतर्गत आर्थिक लाभ मिळवुन देण्यासाठी गडचिरोली पोलीस दलातर्फे पाठपुरावा करण्यात येणार आहे. तसेच गडचिरोलीतील दुर्गम व अतिदुर्गम भागातील नागरिकांनी  तयार केलेल्या विविध हस्तकलेच्या वस्तुचे प्रदर्शन व विक्रीची स्टॉल लावण्यात येणार आहेत. विवाह सोहळयासाठी उपस्थित राहणाऱ्या वर-वधुच्या सर्व नातेवाईक व मान्यवरांची चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था करण्यात येणार आहे. मागील वर्षी सामूहीक विवाह सोहळा गडचिरोली पोलीस दला अंतर्गत नागरी कृती शाखेतर्फे गडचिरोली येथे पार पाडण्यात आला होता, या वर्षी आलापल्ली येथील क्रीडा संकुल मैदानावर आयोजन करण्यात येणार आहे. गडचिरोली जिल्हा पोलीस अधिक्षक, मा.शैलेश बलकवडे (भा.पो.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली गडचिरोली जिल्हा पोलीस दल व मैत्री परिवार संस्था, शाखा नागपुर हे अधिक परिश्रम घेत आहेत. या विवाह सोहळयाचे आयोजनामुळे आलापल्ली परिसरातील जनतेमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.